www.vinoba.in

सप्टेंबर ६

# ग्राम-सेवा-वृत्त

## मासिक-पत्र

★

## अनुक्रमणिका


| | लेख | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | मननीय विचार | ('अभंग गीतांजली' वरून) | १०५ |
| २ | सत्य | विनोबा | १०६ |
| ३ | सात सवंगडी | शिवाजी | १११ |
| ४ | आईच्या कडेवर | वल्लभभाई | ११४ |
| ५ | श्री-गुणेशाय नमः | विनोबा | ११७ |
| ६ | गुरुदेवांचें पुण्यस्मरण | आचार्य भागवत | १२० |
| ७ | गांधी-जयंती संवाद | संपादकीय | १२३ |
| ८ | आश्रम-समाचार | (मलपृष्ठ २, ३ व ४) | |


★

वर्गणी :

वार्षिक वर्गणी १ रुपया

संपादक :

वल्लभभाई भगवानजी पटेल

www.vinoba.in



# आश्रम–समाचार

**सुरगांव—** पंढरिनाथ, दगडूभाऊ, दादामास्तर, नामदेवराव कलोडे यांना ताप येऊन गेला. श्री. विठ्ठलराव निंबाळकर यांनीं सुरगांव-सफाईचें कार्य हातीं घेतलें आहे. त्यांच्या बरोबर त्यांच्या गांवचे श्री. फत्तेलालजी नांवाचे गृहस्थ असतात. यमुनाबाई आणि महादूभाऊ कांहीं दिवसांसाठीं विश्रांति म्हणून नालवाडीला रहावयास आले आहेत.

**पवनार—** श्री. दामोदरदासजी मूंदडा विश्रांतिसाठीं सहकुटुंब रहायला आले आहेत. बंगल्यावर कोटीजी, नामदेव, निंबाळकर, फत्तेलाल, रामलिंग वगैरे मंडळी रहातात.

**नालवाडी—** लक्ष्मण नांवाचा एक नवीन मुलगा निंबाळकर यांनीं स्वतःच्या गांवाहून आणला आहे. तो परिश्रमालयांत कताईचें शिक्षण घेत आहे. श्री. बाबाजी मगर्दे सध्यां गीता–प्रचारासाठीं न जातां येथेंच रहाणार आहेत.

**खादी-समितीच्या ऑफिसमध्यें काम करणारे श्री. आनंदराव भालकर हे कांहीं दिवसापासून आजारी होते. त्यांना न्यूमोनियामुळें मंगळवार ता० २ रोजीं वर्धा हॉस्पिटल मध्यें देवाज्ञा झाली. ईश्वर त्यांचे आत्म्यास शांति देवो.**

श्री. मेथेजी यांना सायकलवरून पडल्यामुळें गुडघ्याला मोठी इजा झाली. आतां जखम भरत चालली आहे.

पू० विनोबांना गेल्या महिन्यांत ता० १९ ते २७ पर्यंत ९ दिवस नागपूर जेलमध्यें सतत ताप येऊन गेला. आतां त्यांची प्रकृति बरी आहे. ता० १२ रोजीं राधाकृष्णजी त्यांना भेटून आले. गोपाळरावजींची प्रकृति उत्तम आहे. श्री. बुद्धसेन यांना ताप येऊन गेला.

( मल पृष्ठ ३ पहा )

www.vinoba.in

# ग्राम-सेवा-वृत्त

वर्ष ५ } १५ सप्टेंबर १९४१ { अंक ६

## मननीय विचार

पुरे आराधना भजन पूजन । पुरे हें साधन सोडी सारें ॥
एकांतीं बैसोनी येथें अंधकारीं । काय देवागारीं करिसी तूं ॥
मन या अंधारीं लपवूनि कोणा । पूजिसी शहाण्या गुप्तपणें ॥
नेत्र उघडोनी सन्मुख तूं पाहीं । देव येथें नाहीं मंदिरीं या ॥
जेथ दीन जन मृत्तिका भरिती । भूमि नांगरिती कृषीवल ॥
फोडोनी दगड रचितसे पथ । कामगार जेथ वर्षभरी ॥
तेथें वृष्टीखालीं प्रखर उन्हांत । भिजत तापत देव राबे ॥
हात पाय वस्त्रें धुळीनें भरलीं । तयापरि धूळीमाजी जा तूं ॥
शुचिर्भूत तुझीं वसनें टाकोनी । येई दीन जनीं देवासाठीं ॥
मुक्ति मुक्ति ऐसें काय गर्जितोसी । कोठें पाहतोसी मुक्ति दावीं ॥
स्वामीनें आमुच्या सृष्टीचें बंधन । स्वयें स्वीकारोन विश्व केलें ॥
ध्यान हें सोडोनी पुष्पकरंडक । फेंकीं, हो सेवक दीनासम ॥
प्रावर्णे मलीन जीर्ण अंगीं लेई । दीनासवें होई एकजीव ॥
श्रमित त्यांसंगें करीं भवकर्म । वाहूं दे कीं घाम अंगांतूनि ॥

—स्व. कविवर्य रवीन्द्रनाथ टागोर

( 'अभंग गीतांजली' वरून )

दलित-सेवक, सप्टेंबर १९४१]

www.vinoba.in

# सत्य

[ सत्य, अहिंसा, अस्तेयादि एकादश व्रतांपैकीं विनोबांनीं
सत्यावर रचलेले अभंग खालीं देत आहों. —संपादक ]

१ सत्य विश्वाचें ह्या मूळ । सत्य धर्माचें जें बळ
सत्याग्रह-तत्त्वसार । सत्य हें चि परमाधार
सत्य आधीं तें उलगडूं । वाणीचे हि दोष फेडूं
सत्य गाऊं सत्य ध्याऊं । विन्या म्हणे सत्य पाहूं

२ सत् स्वयें असणें सत्य असणेंपण
त्याहूनि जें अन्य तें चि शून्य
नसे चि जें मूळीं टिकेल तें कैसें
नसे आणि नासे लटिकें वाया
वेगळे विरोधी अभाव हे तीन
पदार्थां लागून वर्ग होती
सत्यसंबंधांत तिन्ही वर्ग एक
जो मिथ्या-नामक विन्या म्हणे

३ ईश्वरासि मिथ्या न होणें अगत्य
म्हणूनि तो सत्य स्वयें होय
सत्य हें चि नाम सत्य हें चि रूप
सत्य चि संकल्प ईश्वराचा
शासकावांचूनि आमुचें न चाले
ह्यामुळें रूढलें ईश्वर-नाम
विचारितां खोल सत्य-नाम एक
पूर्णार्थ-सूचक विन्या म्हणे

४ ब्रह्म सत्यं हा तों लौकिक उच्चार
तात्त्विक विचार सत्यं ब्रह्म
सूर्य तेथ प्रभा सत्य तेथ ज्ञान
विशुद्ध विज्ञान चिद्रूप जें

www.vinoba.in


सत्य ज्ञान दोन्ही मिळतील जेथ
तेथ शोकातीत नित्यानंद
सच्चिदानंद ही ऐसी ब्रह्मसंज्ञा
वेदाची जो प्रज्ञा विन्या म्हणे

५ सत्याचें ह्या आराधन । साधावया हें जीवन
कार्य-मात्र सत्यासाठीं । श्वास-मात्र सत्यासाठीं
ऐसें वळण लागतां । नियम सहज जडती हाता
सत्याविण नियम केला । दंभ अथवा भास झाला
एक्या नियमाचें पालन । शुद्ध न घडे सत्याविण
नियम सत्यें सोपे जाती । विन्या म्हणे ही निश्चिती

६ सत्य बोलणें हा सत्यार्थ सामान्य
जगीं असे मान्य संकुचित
वाणींत कृतींत विचारात सत्य
विशाळ हा अर्थ घेऊं आम्ही
व्यापक हें सत्य संपूर्ण जो जाणे
त्यासि तों जाणणें उरलें नाहीं
ज्ञान-मात्र सत्यीं असे सामावलें
सहज हाता आलें विन्या म्हणे

७ सत्यावेगळें तें ज्ञान मिथ्या होय
आनंदासि सोय तेथें कैंची
ज्ञान आनंद ह्या सापेक्ष कसोट्या
भुलवण्या मोठ्या व्यवहारीं
सत्याची कसोटी निरपेक्ष निश्चित
सांगेल त्वरित कार्याकार्य
पहावें न पहावें पढावें न पढावें
सत्यासि पुसावें विन्या म्हणे

www.vinoba.in



८ सत्य कामधेनु सत्य परिसमणि
परी त्रिभुवनीं दुर्लभ कीं
सत्याचें तें मुख हिरण्मय-पात्रें
झांकिलें विचित्रें मायामोहें
मोह निरसूनि सत्य जडे कैंवी
दयावंत दावी उपाय तो
अभ्यास वैराग्य हे दोन उपाय
म्हणे करित जाय साक्षेपेंसीं
सत्याचा चि ध्यास ह्या नांव अभ्यास
अन्यत्र उदास वैराग्य तें
धन ऋण दोन्ही मिळूनि साधन
परिपूर्ण जाण विन्या म्हणे

९ साधकांसि येथें असावी सूचना
सत्याची कल्पना बहुविध
एकाचें सत्य तें एकाचें असत्य
अनुभव नित्य येईल हा
परी येथ नाहीं भिण्याचें कारण
असेल प्रयत्न शुद्ध जरी
एकविध भाव मोकळें चिंतन
निष्ठेचे हे दोन पंख थोर
गगन-विहारी सत्याची भरारी
दोन्ही पंखांवरी विन्या म्हणे

१० पानें मोजितां अगणित । वृक्ष एक हें गणित
तैसीं सत्यें भिन्न भिन्न । मूळ सत्य तें अभिन्न
एक ईश्वरत्व जैसें । भक्तांसाठीं विविध भासे
तैसा सत्याचा स्वभाव । सत्य ईश्वराचें नांव

www.vinoba.in

ज्यासि भासले जें सत्य । तेणें सेवावें तें नित्य
ह्यांत कांहीं दोष नाहीं । विन्या म्हणे कर्तव्य हि

११ सत्य देखण्यांत असूं शके भूल
आप चि निर्मूळ होईल ती
सत्य-शोधकें तों तप चि करणें
आपण सोसणें दुःखभार
सत्य शोधण्यांत मरूनि सुटणें
स्वार्थाचें सांडणें करूनियां
निःस्वार्थ शोधनीं कुणी अंतवरी
न चुके निर्धारीं विन्या म्हणे

१२ चुके ठेंच लागे पुन्हां ये सरळ
सत्याचा प्रांजळ मारग हा
सत्याराधना ही भक्ति म्हणविते
फार आवडते हरीतें जी
भक्ति परी मिळे जीवाचिये साटीं
भ्याडपणें गोष्टी बोलूं नये
हरीचे मारगीं नसे हार खाणें
मरूनियां जिणें मंत्र येथ
सत्य-चर्या ऐसी करितां ही भली
अहिंसा लाभली विन्या म्हणे

१३ दधीचि प्रह्लाद शिबि हरिश्चंद्र
प्रभु रामचंद्र भीष्मदेव
हसन हुसेन मन्सूर सुक्रात
ख्रिस्त-आदि संत निष्ठावंत
प्रसंगीं चिंतावे सत्याचे हे मूर्त
ज्वलंत दृष्टान्त लहानथोरीं

चालतां बैसतां खातां पितां गातां
हासतां खेळतां सत्य ध्यावें
सत्याचे चि ध्यानीं लावूनियां मन
निर्दोष निःस्वप्न निद्रा घ्यावी
रत्न-चिंतामणि संतां सत्य जैसें
आम्हां व्हावें तैसें विन्या म्हणे.

---

गान्धीजी रचनात्मक कार्यक्रम पर अितना ज़ोर क्यों देते हैं, इसे समझने के लिये हरअेक को रवीन्द्रनाथ के 'स्वदेशी', 'समाज' और 'समूह' ये तीन निबन्ध पढ़ने ही चाहिये। मानवीय हृदय की व्याकुलता अगर देखनी हो, तो रविबाबू की 'चोखेरबाली' पढ़िये। रामायण की टक्कर की तलाश हो, तो 'नौका डूबी' पढ़िये। सामाजिक सुधार के अन्तर्गत धर्मतत्त्व को पहचानना हो, तो 'गोरा' का अध्ययन कीजिये। भिन्न-भिन्न प्रसंगों पर दिये हुए उनके प्रवचन तो प्रत्यक्ष उपनिषद ही हैं।

* * * *

उनका दिया हुआ 'जन-गण-मन-अधिनायक जय हे' यह राष्ट्रगीत हमारी भारतीय भावना और विश्व-समन्वय के सर्वथा अनुकूल है। उनका यह गीत और........— 'हे मोर चित्त पुण्य तीर्थे जागो रे धीरे अेअी भारतेर महा मानवेर सागरतीरे—यह गीत राष्ट्र में सर्वत्र गाये जाने चाहिये। ये हमारे दीक्षा-गीत बन जाने चाहियें। भारत-भास्कर की यह सर्वश्रेष्ठ देन है।

सर्वोदयमधून ]

—काका साहेब

---

www.vinoba.in


# सात सवंगडी

[ले : शिवाजी ]

" दीड महिना झाला; पाऊस नाहीं. शेती वाळून चालली. कसें व्हायचें ? शेतकऱ्याचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली !"—पाऊस जेथें पडला नाहीं तेथें ठिकठिकाणीं असे उद्गार नेहमीं च ऐकूं येतात.

पण जो परमेश्वर एक दाणा पेरल्याबरोबर त्याचे शेंकडों दाणे होतील असें कणीस देण्याची कृपा करतो, त्या परमेश्वराच्या राज्यांत दुष्काळ पडण्याचें कारण च काय ? याचा कोणी च विचार करीत नाहीं. यंदा पाऊस आला नाहीं म्हणून डोळे पांढरे होण्याची जरूर काय ? नाहीं एक वर्ष पाऊस पडला. त्यामुळें अन्नान्नदशा कां व्हावी ? " धान्याच्या एका दाण्याचे शेंकडों दाणे तुला मी दिले ते तूं कोठें ठेवलेस " असें ईश्वर नाहीं म्हणणार ? ईश्वर काय यंत्र आहे ? अगदीं ठराविक यांत्रिक पद्धतीनें त्यानें पाऊस पाडला च पाहिजे असा आग्रह कां ? कोणी म्हणेल धान्याचें असो, पण पिण्याच्या पाण्याचें काय करावें ? त्याला हि ईश्वराचा जबाब आहे. " मी दरवर्षी पाऊस पाडतो त्याचें पाणी तुम्ही कां सांठवत नाहीं ? प्रत्येक शेतांत तुम्हांला विहिरी कां करतां येऊं नयेत ? तुम्ही बंधारे घालून तळीं कां केलीं नाहींत ? सगळेंच्या सगळें पाणी तुम्ही समुद्रांत कां वाया दवडलेंत ? आणि एखादे वर्षी, आणि तो हि एखाद दुसऱ्या प्रांतांत पाऊस पडला नाहीं तर त्याचा दोष माझ्याकडे देतां ? तुम्हांला माझी कल्पना नाहीं. मी काय भिकारी आहे ? माझ्या ऐश्वर्याला सीमा नाहीं. माझ्याकडे मोजमाप नाहीं. म्हणून च एका दाण्यांतून शेंकडों दाणे मी फेंकून देतों. आणि पाणी पाडतों तेव्हां पिपेंच्या पिपें—अरे, नद्याच्या नद्या वरून झोंकून देतों. पण तुम्ही अव्यवस्थित माणसें त्याचा कांहीं उपयोग करीत नाहीं. शिवाय ज्याच्याजवळ धान्य आणि संपत्ती आहे, तो अशा वेळीं ती दुसऱ्याला कां देत नाहीं ?—वास्तविक हा मी अकाल पाडला नसून परस्पर सहानुभूतीचा दुकाळ च पाडला आहे हें तुमच्या लक्षांत केव्हां येणार ?"

परस्परसहकार्य, व्यवस्थाशक्ति आणि उद्योग जेथें आहे तेथें अकाल कसा पडेल ? कसा हि प्रसंग येवो तेथलें सर्व जीवन सुरळीत चाललें च पाहिजे. सप्तर्षींचें असें जीवन होतें. ते शेती करीत. ते यज्ञ करीत. म्हणजे परस्परांचें आणि समाजाचें उणें दूर करीत. त्यामुळें त्यांना ज्ञान आणि ध्यानाला अवसर सांपडे. त्यामुळें ते दीर्घायुषी होते. ऋषि आणि लांब शुभ्र जटा व दाढीमिशा नाहींत अशी कल्पना च व्हावयाची नाहीं. ऋषींच्या दीर्घायुष्यांची ती खूण आहे. आपल्या साधुजीवनानें ते दीर्घजीवी झाले.




घड्याळाचे काटे फिरतात त्याच्या उलट दिशेनें ध्रुवमत्स्य तारे फिरतात. सप्तर्षींना उदयास्ताचे फेरे फिरावे लागतात पण ध्रुवमत्स्यांना भ्रमण असून उदयास्त नाहींत.

परंतु इतक्या अनुभवी दीर्घ ऋषिजीवनापेक्षां हि अननुभवी निर्दोष बालजीवन हें च आपल्याजवळ असलेलें चांगलें असें ध्रुवाला वाटलें. कारण ध्रुव स्वतः बाल च. समानतेशिवाय सख्य नाहीं असा त्यानें विचार केला असावा. शिवाय मोठेपणाचें तरी लक्षण कोणतें ? 'व्हावें लहानाहूनि लहान' हें च मोठेपणाचें चिह्न. म्हणून त्यानें आपल्या भोंवतीं लहान लहान अशा सहा सवंगड्यांचा मेळा जमवला त्यामुळें सप्तर्षींचे जसे सात तारे तसे

ध्रुवासकट हे सात तारे झाले. हे तारे सप्तर्षींच्या मानानें अस्पष्ट आहेत. कारण कांहीं झालें तरी बालकें च तीं. त्यांचा आकार मोठा कोठून असणार ? तथापि सप्तर्षींप्रमाणें त्यांचा आकार हि चार पुढें आणि तीन एका वक्र रेषेंत मागें, असा जवळ जवळ सप्तर्षींसारखा च आहे. या ताऱ्यांना उदयास्त नाहींत. कोणत्या हि रात्रीं कोणत्या हि वेळीं हे आकाशांत दिसावयाचे च. या पृथ्वीचा म्हणजे मृत्युलोकाचा त्यांना स्पर्श च नाहीं. सप्तर्षि जरी ध्रुवाच्या जवळचे तरी या बाल सवंगड्यांच्या मानानें दूरचे च. सप्तर्षींना उदयास्ताचे फेरे फिरावे लागतात, पण 'काळाचे हि काळ । आम्ही विठोबाचे बाळ' अशा या ताऱ्यांना भ्रमण असून उदयास्त नाहींत. घड्याळाचे काटे फिरतात त्याच्या उलट दिशेनें हे तारे भ्रमण करीत असतात. रात्रीच्या वेळेला त्यामुळें केव्हां हि यांच्या स्थितीवरून किती वाजले असावे याचें अनुमान होऊं शकतें. निजतेवेळीं यांची स्थिति पाहून ठेवली असली म्हणजे हें अनुमान अगदीं सहज होऊं शकतें. एखादा मासा जसा एकसारखा पाण्यामध्यें वरखालीं सहज लीलेनं डुबकत रहावा तसे हे तारे आकाशब्रह्मांत डुबक्या मारीत असतात. म्हणून या सर्वांना मिळून ध्रुवमत्स्य असें हि म्हणतात. ध्रुवमत्स्यामधले चौकडीचे पुढचे दोन तारे स्पष्ट असून ध्रुवाखेरीजचे बाकीचे चार तारे अस्पष्ट तेजाचे आहेत. ध्रुव आणि त्याचे सहा सवंगडी तारे जेथें अस्तोदय नाहीं अशा परमोच्च भूमिकेवर राहून आनंदानें विहार करीत असतात. त्यामुळें त्यांना खालच्या जगांत हि तो च ब्रह्मविहार नटलेला दिसावा आणि त्या च संवादांत ते मग्न असावे यांत नवल कसलें ?

पाहतां जगीं अवघें चि ब्रह्म गड्या ॥ध्रु०॥
सोनें एक नग अनेक । काप फुलें बुगड्या ॥१॥
माती एक घट अनेक । रांजण कीं सुगड्या ॥२॥
तंतु एक पट अनेक । शेले कीं पगड्या ॥३॥

www.vinoba.in

# आईच्या कडेवर

[ लेः वल्लभभाई ]

लेखांक १ ला

## प्रास्ताविक

"स्थितप्रज्ञाचे श्लोक" 'वृत्तां'त येत असतांना कांहीं मित्रांकडून अशी सूचना आली होती कीं दरेक अंकांत गीताईच्या एक दोन श्लोकांविषयीं तरी विवरण येत जावें. परंतु ती लेखमाला संपल्यानंतर गीताईविषयीं लिहावें कीं न लिहावें असें मनांत सारखें चालत होतें. कारण 'वृत्तां'त लिहिणें हें च मोठ्या जबाबदारीचें वाटतें. 'वृत्ता'कडे सर्व लोक विनोबांचें मासिक म्हणून पहाणार, पहावें. माझ्यापेक्षां अनेक प्रकारें वृद्ध व शुद्ध असणारीं माणसें हि वृत्तासाठीं लेख लिहिण्यास कचरतात. ते म्हणतात कीं विनोबांच्या लेखा शेजारीं बसूं शकेल असें आम्ही काय लिहिणार ?

गीतेविषयीं लिहिणें हें एका दृष्टीनें त्याहून हि कठिण. गीता हा फार थोर ग्रंथ. हिंदुस्थानांत धार्मिक दृष्टीनें केल्या गेलेल्या उत्थानांची स्फूर्ति प्रत्यक्ष वा परंपरेनें गीतेपासून मिळत आली आहे. गीतेच्या या स्वगत गुणामुळें बहुतेक आचार्यांनीं व थोर पुरुषांनीं गीतेवर भाष्यें, टीका लिहिल्या. त्या लिहितांना त्यांची वृत्ति अत्यंत नम्रतेची दिसते. "मीं योगेश्वर कृष्णाच्या मुखें प्रत्यक्ष ऐकिलें" असें म्हणणारा संजय हि गीतार्थ जाणत असेल किंवा नसेल हि कोण जाणें ! ( संजयो वेत्ति वा न वा )—असा संशय व्यक्त केला गेला आहे. गीतेचे आद्य भाष्यकार शंकराचार्य उपोद्घात-भाष्यांत—तदर्थाविष्करणाय यत्नः क्रियते मया—गीतेचा अर्थ उलगडण्याचा मी प्रयत्न करतों अशी नम्रतेची भाषा वापरतात. ज्ञानियांचे राजे ज्ञानेश्वर व्यासाचा मागोवा घेत, भाष्यकारातें वाट पुसत आपण जात आहों असें म्हणतात. अशी च नम्रतेची वृत्ति अरविंद, टिळक, गांधी इत्यादि थोर पुरुषांची. माझ्यापेक्षां अधिक योग्य अशा एका मित्राला एकदां मीं सुचविलें कीं वृत्तासाठीं गीताईचे एक दोन श्लोक घेऊन त्यावर लिहाल तर बरें होईल.

तेव्हां 'जरी मी गीतेविषयीं अभ्यास केला असला तरी तो पूर्ण झाला नाहीं' असें म्हणून त्यांनीं तें नम्रपणें नाकारलें. अशा सर्व स्थितींत मीं गीताईसंबंधीं कांहीं लिहिणें म्हणजे जेथें देवदूत पाय टाकायला हि कचरतात तेथें वेडीं माणसें खुशाल संचरतात या म्हणीसारखें होत आहे. याची जाणीव असून हि मला लिहावेंसें वाटतें याचें एकच एक कारण म्हणजे गीता जें मानवांना सांगून राहिली आहे तें मीं ऐकावें, सर्वांनीं ऐकावें असें मला पुनः पुन्हां वाटतें हें होय.

गीतेंतच सांगितल्याप्रमाणें या बाबतींत "यज्ञांत जपयज्ञ मी" हें मला पटतें. गीतेचा जप करतां करतां, गीतेचे दोन शब्द कानीं पडतां पडतां, ते ऐकण्याच्या प्रयत्नांतच अर्थ हि कळत जाईल. "पुढें गेले त्यांचा शोधीत मारग" या न्यायानें आपल्या पूर्वीं ज्यांनीं गीतार्थ ऐकण्याचा प्रयत्न केला आहे त्यांची हि मदत आपल्याला मिळणार आहेच. किंवा असेंच म्हणाना कीं त्यांच्या अर्थांतलेंच यथारुचि, यथामति यांत मी मांडणार आहें. विनोबांनीं गीतेविषयीं लिहून ठेवलेल्या कांहीं टीपा, त्यांचीं गीताप्रवचनें वगैरेंचा हि उपयोग करीन. तरी यांत मांडलेल्या विचारांची जबाबदारी माझी समजली पाहिजे. यांतल्या चुका, गैर विचार वगैरेंची जबाबदारी माझी, यांत कांहीं चांगलें असल्यास इतरांचें—असा विभाग केल्यास चालेल. विनोबांचा व माझा संबंध, त्याच प्रमाण माझ्या लेखांत त्यांच्या लिखाणांचा किंवा टीपांचा केला जाणारा उपयोग यामुळें कांहीं गैरसमज होऊं नये म्हणून ही सूचना.

गीता ही एका बाजूनें समजायला अत्यंत कठिण असली तरी दुसऱ्या-बाजूनें अत्यंत सोपी हि होऊं शकते. रामकृष्ण परमहंसांना कोणा पंडितानें जाऊन विचारलें कीं गीतेचें तात्पर्य काय? पंडिताच्या मनांत असेल कीं हे आतां कर्मसंन्यासयोग, कर्मयोग, प्रपत्तियोग असें कांहीं तरी उत्तर देतील, आपल्या मताचें मंडन करतील, इतरांच्या मताचें खंडन करतील वगैरे. रामकृष्णांनीं सहजपणें उत्तर दिलें 'अरे! गीतेचें तात्पर्य अगदीं सोपें आहे. गीता, गीता असें लौकर लौकर म्हणा म्हणजे तिचें तात्पर्य—तागी,

www.vinoba.in

तागी–तुमच्या लक्षांत येईल. गीता सांगते त्याग करा, त्याग करा.' हें ऐकून तो पंडित थक्कच झाला असेल ना !

आणि आईच्या जवळ जाण्यासाठीं, तिचे दोन शब्द ऐकण्यासाठीं इतकें संकोचण्याचें कारण तरी काय ? मूल जितकें नेणतें, दुःखी तितकी अधिक काळजी घेणें हा तर माउलीचा स्वभाव च. आणि आपण नेणते प्रसिद्ध च आहों. आपलें नेणपण किती दाट व खोल ! स्वामी रामतीर्थांनीं सांगितलेली एक गोष्ट आठवते. एक माणूस पहांटे उठून लोकांना शिरणी वांटूं लागला. लोक विचारूं लागले कीं, बाबा ! कोणती आनंदाची गोष्ट घडली कीं तूं गूळ वांटतोस ? तेव्हां तो म्हणाला कीं काल रात्रीं चोरांनीं माझा घोडा चोरून नेला. लोक म्हणाले वाह रे शहाणा ! घोडा चोरला गेला म्हणून दुःख मानायचें कीं आनंदानें गूळ वांटायचा ? तेव्हां त्या खऱ्या शहाण्यानें उत्तर दिलें कीं चोरानें नुसता घोडा च चोरून नेला, मला चोरून नेलें नाहीं म्हणून मला आनंद होत आहे. आम्हांला काम-क्रोधादींनीं चोरून नेलें असून त्याची जाणीव हि नाहीं.

आपल्या अज्ञानाची जाणीव असणें हें च मोठें ज्ञान. अथेन्सच्या देवीच्या देवळांत एका भक्तानें जाऊन अथेन्समध्यें सर्वांत शहाणा कोण आहे हें सांगण्याविषयीं देवीला कौल लावला. देवीनें उत्तर दिलें कीं सॉक्रेटीस सर्वांत शहाणा आहे. तो भक्त सॉक्रेटीसकडे येऊन विचारूं लागला कीं तुम्ही सर्वांत शहाणे कसे ? सॉक्रेटीस म्हणाला हें मला कां विचारतोस ? ज्यानें तुला तें सांगितलें त्याला विचार. आतां इतकें खरें कीं इतरांना आपण अज्ञानी आहों हें हि कळत नाहीं. व मला मी किती अज्ञानी आहें हें कळत आहे. या फरकामुळें च मी सर्वांत शहाणा ठरलों असल्यास सांगतां येत नाहीं.

शुद्ध आत्मस्वरूपापासून घसरून काम-क्रोध–लोभांच्या जाळ्यांत गुरफटण्याइतके खालीं पडलों असून हि त्याची जाणीव नाहीं मग त्याविषयीं रडणें किंवा दुःख करणें दूर च. इतकें च काय आमच्या सुखाच्या, ज्ञानाच्या कल्पना हि निराळ्या आहेत. जो बहुवे विषयविलासें गुंफे । तो म्हणती

www.vinoba.in

उवाई पडिला सांपे । जो अभिलाषभारें दडपे । तयातें सज्ञान म्हणती ॥ इत्यादि प्रकारें ज्ञानेश्वरांनीं अत्यंत कळकळीनें आपल्याला जागविलें आहे. पण संतांचें सांगणें ऐकूं तेव्हां ना ? आर्य मनुष्य चेंडूप्रमाणें पडला तरी पुन्हां उठतो. त्याप्रमाणें आपण पुन्हां ऐकण्याचा प्रयत्न करूं या. आईचे इतर बोल ऐकण्यापूर्वीं नम्रभावें तिचा जयजयकार करूं या.

गीताई माउली माझी तिचा मी बाळ नेणता ।
पडतां रडतां घेई उचलूनि कडेवरी ॥

---

## श्री–गुणेशाय नमः

**गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा—समर्थ**

समर्थांनीं 'मनाच्या श्लोकांच्या' सुरुवातीला रीतीप्रमाणें गणपतीचें स्मरण केलें आहे. त्यांत वरील चरण आला आहे, तो सगळ्यांच्या परिचयाचा आहे. परिचयामुळें त्यांतला चमत्कारिकपणा आपल्याला भासत नाहीं. पण त्यांत समर्थांनीं 'मनाचें व्याकरण' वापरलें आहे. 'जनाचें व्याकरण' वापरलें असतें तर 'गणाधीश जो ईश सर्वां गणांचा' असें म्हणावें लागलें असतें. समास सोडविण्याची ही पद्धत 'मनाच्या श्लोकांत' म्हणून शोभून गेली. किंवा ही 'आर्ष' पद्धत आहे, असें म्हणावें पाहिजे तर. कसें हि म्हटलें तरी, 'गणाधीश' म्हणजे 'गुणाधीश' हें आतां तोंडपाठ होऊन गेलें आहे. तें कांहीं टळत नाहीं.

तोंडपाठ तर तें झालें आहे. पण तें हृदयपाठ करण्याची जरूरी आहे. देवाचें स्वरूप आहे 'गणाधीश'. पण तें देवाचें देवाला साजतें. भक्ताला त आपल्या भाषेंत जमवून घेतलें पाहिजे. देव असेल गणाधीश, पण त्याचा मला काय उपयोग ? मी गणाधीश बनूं ? मी लोकांवर सत्ता चालवूं ? मला सत्ता आहे च कोठें ? आणि असली तरी कितीशी आहे ? बरें जी काय

असेल ती तरी ‘ माझी ’ आहे काय ? आणि ती मी लोकांवर चालवूं ? मी जर लोकांवर सत्ता चालवूं लागलों तर मला लाथा नाहीं खाव्या लागणार ? मग ‘ गणाधीशाला ’ घेऊन मी काय करूं ? मी त्याचें चिंतन अवश्य करीन. पण अनुकरण मला करतां येणार नाहीं. अनुकरण करीन तर पतित होईन. नृसिंहाचें चिंतन करावें. प्रह्लादाचें अनुकरण करावें. नृसिंह आणि प्रह्लाद दोन्हीं देवाचीं च रूपें आहेत. पण त्यांतलें एक रूप ‘चिंत्य’ आहे. आणि दुसरें अनुकरणीय आहे. म्हणून ‘नृ-सिंह’ ह्या समासाचा विग्रह करतांना त्या विग्रहांतून ‘प्रह्लाद’ हा अर्थ निघेल अशी मला खबरदारी राखली पाहिजे. व्युत्पत्तीच्या आधारानें ‘सहन’ करतो तो ‘सिंह’, आणि मनुष्यांतला अत्यंत सहनशील तो ‘नृ-सिंह’ म्हणजे प्रह्लाद; असें ‘मनाचें व्याकरण’ चालविणें गैर नाहीं. नव्हे असेंच व्याकरण चालविलें पाहिजे. त्यानें पाणिनीचा कदाचित मार सहन करावा लागेल. पण त्याला इलाज काय ? आणि जो सिंहाला हि सहनशीलता शिकवायला बसला तो पाणिनीच्या माराला थोडा च भितोय् ? समर्थांनीं हि हाच विचार करून गणाधीश म्हणजे गुणाधीश असें दडपून दिलें. कदाचित् त्यांच्या मनांत ‘गणाधीश जो दास सर्वां गणांचा’ असेंच लिहावयाचें असेल. आणि तसें लिहिलें असतें म्हणून कांहीं बिघडलें नसतें. कारण जगाचा स्वामी झाला तरी तोच होईल, जो जगाची सेवा करील. देव सुद्धां ‘ अणोरणीयान् ’ झाला म्हणून च ‘ महतो महीयान् ’ ह्या पदवीला चढला. जनीचें दळण दळल्याशिवाय कां तिच्या-कडून भक्ति पिसून घेतां आली ? पण ‘ गणाधीश ’ म्हणजे ‘ गणांचा दास ’ असा समास सोडविण्यांत अगदीं च दंडेली केल्यासारखें झालें असतें. म्हणून समर्थांनीं विचार केला कीं, ‘ गणाधीश ’ म्हणजे ‘ गुणाधीश ’ एवढें च बस आहे. पाणिनि परीक्षाच घ्यायला बसला, तर ‘उ’ का चुकून तर नसेल पडला असा त्याला संशय येईल. आणि संशयाचा फायदा कदाचित् आपल्याला मिळून हि जाईल! बरें खुलाशावरच पाळी आली तर खुलासा देऊन टाकूं: “ हें पहा गुरुजी, ‘ गणाधीश ’ म्हणजे तुम्हीं शिकविल्याप्रमाणें, ‘ गणांचाच ईश ’. पण ‘ गण ’ कोणचे ? तर ‘ गुण–गण ’. एवढेंच माझें म्हणणें. मिळून

'गणाधीश' म्हणजे 'गुण–गणाधीश' किंवा थोडक्यांत 'गुणाधीश'! शिवाय मी थोडक्यांत भागवलेलें नाहीं च. 'गण' म्हणजे 'गुण–गण.' हा माझा अर्थ 'सर्वां गुणांचा' ह्या मराठी शब्दांत स्पष्ट आहे." इतक्या खुलाशावर विचारवान् पाणिनीचें समाधान होण्यास हरकत नसावी.

अशा रीतीनें समर्थांनीं रूढ व्याकरणाची समजूत तर घातली च. पण 'गणाधीश जो दास सर्वां गणांचा' हा आपल्या मनांतला अर्थ हि त्यांनीं पर्यायानें साधून घेतला. कारण गणांचा दास तरी कोण होऊं शकेल? ज्याच्यांत सेवेचे गुण असतील तो. ज्याच्यांत सेवेचे गुण च नाहींत तो सेवा कशी करणार? म्हणून एकंदर तर्क असा बसला:—

(१) जो गुणांचा स्वामी होईल तो च गणांची सेवा करूं शकेल.

(२) जो गणांची सेवा करील तो च झाला तर गणांचा स्वामी होईल.

(३) म्हणून गणाधीश म्हणजे गुणाधीश असा अर्थ झाला.

पण ह्यावरून असें समजावयाचें नाहीं कीं, गणाधीश बनण्याकरितां गुण मिळवावयाचें. ज्याच्या ठिकाणीं गुणांचा विकास झालेला असेल तो च गणांचा अधिपति किंवा मार्गदर्शक बनतो. पण गणांचा मार्गदर्शक बनण्याच्या आत्मसंभावित प्रेरणेनें कोणी गुणविकास करूं पाहील तर गुणविकास होण्याऐवजीं, गुणसंकोच मात्र पदरांत पडेल. किंवा गणाधीश बनण्यासाठीं गुण मिळवावयाचे असें च का म्हणाना. पण एवढें लक्षांत ठेवा म्हणजे झालें कीं, गणाधीश बनण्यासाठीं जे अनेक गुण मिळवावयाचे आहेत त्यांत 'गणाधीश' बनण्याची इच्छा नसणें हा पहिला गुण आहे! गणाधीश म्हणजे गुणाधीश हें तर समीकरण जमलें च. पण गुण कोणाचे हा प्रश्न निघतो. त्याला उत्तर दैवी संपत्तीचे गीतेंत सांगितलेले सव्वीस गुण. ह्यांचा विकास करणें ही च गणपतीची पूजा. एकेका वर्षांत एकेक गुण काबीज केला तरी सव्वीस वर्षांत सव्वीस गणेशोत्सव साजरे होतील. त्यानंतर 'जिंकायला मुलुख उरला नाहीं' म्हणून शिकंदर रडला म्हणतात, त्याप्रमाणें देवाच्या नावानें मंत्रजागर ठोकावा. देवाला तो ऐकणें भाग च येईल.

[ विनोबा

महाराष्ट्र-धर्म १९२६ ]

---

www.vinoba.in

# गुरुदेवांचें पुण्यस्मरण

[ ले : आचार्य स० ज० भागवत ]

['दलितसेवका' च्या सप्टेंबरच्या अंकांत प्रसिध्द झालेल्या लेखामधून]

रवीन्द्रांच्या निधनामुळें आधुनिक भारतांतील एक थोर विभूति अंतर्धान पावली आहे. रवीन्द्रनाथ हे एक महाकवि होऊन गेले. कथा, काव्य आणि नाट्य असे साहित्याचे तीन विभाग आहेत. कथन अथवा वर्णन हें कथेचें प्राणतत्त्व असतें. काव्यांत उत्कट भावनांचा आविष्कार असतो, आणि नाट्यामध्यें जीवनांतील समर-प्रसंगांचें चित्रण असतें. साहित्याच्या या तीनहि विभागांत सारखी च करामत करून दाखविणाराला महाकवि म्हणतात.

रवीन्द्रनाथ हे केवळ रस-साहित्यांत च प्रवीण होते असें नाहीं. संगीत, चित्र, नृत्य, अभिनय इत्यादि ललित-कलांत तितके च निष्णात होते.

रवीन्द्रांची जीवन-विभूति त्यांच्या साहित्य-विभूतीहून हि अधिक भव्य आहे. ज्ञान, सौंदर्य आणि साधुत्व हीं जीवनाचीं त्रिविध मूल्यें आहेत. जीवनाचें सत्य जाणून त्याचा जगताच्या बुद्धीला साक्षात्कार करून देणें हें तत्त्ववेत्त्याचें कार्य असतें. जीवनांतील सौंदर्याची विश्वाला प्रतीति करून देण्याचें कार्य कवि करीत असतो; आणि संसारांत मांगल्याची प्रतिष्ठापना करणें हें साधूचें जीवनकार्य असतें. या तीन हि भूमिकांचें रवीन्द्रनाथांमध्यें आश्चर्यकारक मीलन झालेलें आढळतें. यामुळें रवीन्द्रांचा जीवन-महिमा अवर्णनीय झाला आहे.

हें विश्व म्हणजे परमेश्वराची व्यक्त विभूति असून निर्लोभ वृत्तीनें विश्वाची सेवा करणाराला परमेश्वर स्वरुप प्राप्त होतें असा रवीन्द्रनाथांचा तत्त्वविचार आहे.

विश्वांतील हृदयांत प्रकट होणारा आनंद हा परमेश्वराचा च आनंद असला तरी त्याचा आस्वाद घेण्यासाठीं मनुष्याला आपल्या हृदयांतील मलिन वासनांचा आणि अहंकाराचा होम करावा लागतो, याची रवीन्द्रांना

चांगली जाणीव होती. म्हणून रवीन्द्रांनीं द्वेष आणि हिंसा या वृत्तींचा समूळ उच्छेद करून हृदयांत प्रेम आणि सेवा यांची जोपासना करण्याची साधना सांगितली आहे. ..........या शान्त विश्वांत च अनन्त परमेश्वर भरलेला आहे असें त्यांनीं गायिलें आहे. पण त्या अनन्ताचें दर्शन घेण्या-साठीं द्वैताचीं सारीं बंधनें तोडलीं पाहिजेत असें हि सांगितलें आहे. यामुळें रवीन्द्रांच्या धर्मविचारांत वर्णभेद, जातिभेद इत्यादि संकुचित भावनांना मुळीं च स्थान नाहीं. त्यांचा धर्म म्हणजे विश्वव्यापी प्रेमधर्म होय.

विश्वजीवनाशीं समरस होऊन विश्वाचें दैन्य दूर करण्याचा मार्ग कवीनें दाखविला पाहिजे. तर च त्यांचें काव्य कृतार्थ होतें, असें त्यांना वाटूं लागलें आणि त्यांनीं प्रत्यक्ष सेवा-कार्यांत प्रवेश करण्याचा निश्चय केला. प्रकृतिधर्माला अनुरूप असा सेवेचा प्रकार त्यांनीं शोधून काढला. आणि शांतिनिकेतनमध्यें आपल्या प्रख्यात शैक्षणिक प्रयोगाला सुरवात केली.

रवीन्द्रनाथांनीं याच वेळीं राजकारणांत हि प्रामुख्यानें भाग घेतला होता. वंगभंगाच्या चळवळींत अरविंदांच्या बरोबरीनें त्यांनीं तेजस्विता ओतली होती. तथापि राजकारणाची त्यांची कल्पना व्यापक होती. 'स्वदेशी समाज' या ग्रंथांत रवीन्द्रनाथांनीं स्वावलंबी समाजोद्धाराचा कार्यक्रम सांगितलेला आहे. त्यांत हिंदुमुस्लिम ऐक्य, हस्तव्यवसायांचें पुनरुज्जीवन, अस्पृश्यता-निवारण आणि ग्रामीण जनतेचें सेवेच्या द्वारें संघटन असा विधायक मार्ग सुचविला आहे. त्या वेळच्या उतावळ्या तरुणांना तो मिळमिळीत वाटला आणि त्यांनीं अत्याचारी मार्गाचा स्वीकार केला. रवीन्द्रनाथ हे अत्याचाराच्या संपूर्ण विरुद्ध होते. तो मार्ग व्यावहारिक दृष्टीनें विफल होणारा आणि नैतिक दृष्टीनें भारतीय परंपरेस कमीपणा आणणारा आहे अशी त्यांची दृढ समजूत होती. अर्जविनंत्यांचें परावलंबी राजकारण त्यांना क्षुद्र वाटत होतें. संपूर्ण नैतिक सामर्थ्यावर च आपल्या देशाचा अभ्युदय अवलंबून आहे असा त्यांचा विश्वास होता. यामुळें हिंदुस्थानांतील राजकारणाशीं त्यांचा संबंध वंगभंगाच्या चळ-वळीनंतर बरींच वर्षें राहिला नाहीं. पण महात्मा गांधींनीं दक्षिण आफ्रिकेंत

सत्याग्रहाचा लढा सरू केला त्यावेळीं शांतिनिकेतनमधून रवीन्द्रनाथांनीं सत्याग्रहांत भाग घेण्यासाठीं अँड्रूयूज आणि पियर्सन या आपल्या सहकाऱ्यांना पाठवून दिलें. पंजाबमधील सरकारी अत्याचारामुळें त्यांनीं आपला सर हा किताब व्हॉईसरॉयकडे परत पाठवून दिला. आणि तेव्हांपासून ते महात्माजींच्यां सत्याग्रह चळवळीला सदैव पाठिंबा देत आले. कारण गांधीजींच्या चळवळींत विधायक कार्यक्रमाला महत्त्वाचें स्थान असून सत्याग्रह ही एक उच्च नैतिक शक्ति आहे अशी त्यांची दृढ समजूत होती. यामुळें कांहीं किरकोळ मतभेद सोडले तर, गांधीजींचें राजकारण रवीन्द्रांच्या ध्येयवादाशीं सुसंगत च आहे.

तथापि रवीन्द्रांचें मुख्य कार्य म्हणजे त्यांनीं आपल्या विश्वभारती विद्यापीठातर्फे विश्वाला दिलेला ऐक्याचा आणि प्रेमाचा अमर संदेश. ‘यत्र विश्वं भवत्येकनीडम्’ असा विश्वभारतीचा मुद्रालेख आहे. सर्व विश्व हें मानवकुलाचें एकच घरटें आहे आणि त्यांत सर्वांनीं प्रेमानें आणि सहकार्यानें नांदून आपापला विकास साधावा. विश्वैक्याला विश्वांतील विविधतेचा विरोध नाहीं. पूर्व आणि पश्चिम यांच्या संस्कृतींत जें जें रमणीय आणि जीवनाला हितकर आढळेल तें तें रक्षण करण्याचें कार्य केलें पाहिजे. पाश्चात्यांची भौतिकविद्या आणि पौरस्त्यांची आत्मविद्या यांचा समन्वय साधला पाहिजे हें विश्वभारतीचें प्रयोजन आहे.

मानवप्रेम हा रवीन्द्रांच्या भव्य जीवनविभूतीचा पाया आहे.……………
“हे मोर चित्त, पुण्यतीर्थे जागोरे धीरे” या कवितेंत रवीन्द्रनाथांनीं भारतमातेच्या अभिषेकासाठीं भारतांतील आर्य अनार्य, हिंदु मुसलमान, इंग्रज खिस्ती, ब्राम्हण अतिशूद्र,अशा सर्व जातींच्या आणि पंथांच्या लोकांना आवाहन केलें आहे. या सर्वांचा स्पर्श झाल्याखेरीज मंगलघट भरला जाणार नाहीं आणि भारतमातेचा अभिषेक पूर्ण होणार नाहीं असें त्यांत म्हटलें आहे. ‘हे मोर दुर्भागा देश’ नामक कवितेंत भारतानें ज्या लोकांना शतकानुशतकें अपमानित करून ठेविलें आहे त्यांना सन्मानपूर्वक आपल्याजवळ घेण्याची

www.vinoba.in


विनवणी केली आहे. मनुष्याचा स्पर्श दूर राखणें म्हणजे प्रत्यक्ष नारायणाची च अवहेलना करण्यासारखें आहे. आपण ज्यांना खालीं फेंकतों ते शेवटीं आपणाला च खालीं खेंचतात.................मृत्यूचा दूत दारीं येऊन ठेठावूं लागला असतांहि आपण वर्णाभिमान धरून बसणार काय? आपला जातीय अहंकार आपण सोडला नाहीं तर, शेंवटीं मृत्यूमध्यें चिताभस्मांत सर्वांना समानता प्राप्त झाल्याशिवाय रहाणार नाहीं, असें विचार त्या कवितेंत प्रकट केले आहेत.

रवीन्द्रनाथांनीं दिलेला मानव प्रेमाचा संदेश भारतीयांनीं आपल्या जीवनांत आणिला तरच रवीन्द्रनाथांचें ऋण फेडलें असें होईल.

---

## गांधी-जयंती-संवाद

( हा संवाद उपयोगीं होईल असें वाटल्यावरून दिला आहे. परिस्थितीला अनुसरून नांव-गांवींत फरक करून घ्यावा. —संपादक )

**भाऊः**– ( तकलीवर सूत कांतीत कांतीत गातो— )

अरि ना जगीं तुला रे, तूं शत्रु ना कुणाचा।
अससी अजातशत्रु, तूं मित्र या जगाचा॥
दुःसाध्य जिंकणें जें त्या जिंकिलें मनाला
जो जिंकितो मनाला तो जिंकितो जगाला
जगिं सर्व संस्कृतीला उजळा दिलासि राया
सेवूनि सत्य-प्रेमा झालासि धन्य राया॥

**इतर मुलेंः**– अहाहा! किती गोड गाणें हें! पुनः पुन्हां ऐकावेसें वाटतें. भाऊ, आम्हाला शिकवतोस कां?

**भाऊः**– तुम्हाला शिकायचें आहे कां? म्हणा तर मग.

( एकेक ओळ म्हणवून घेतो. )

**वसंताः**– कां रे दामू, गाणें गोड आहे च. पण त्याचा अर्थ तर त्यापेक्षां हि गोड आहे. नाहीं कां?

www.vinoba.in



दामू:– मला तर हें गाणें फार च आवडलें. मी असलीं गोड गाणीं च पाठ करणार. दुसरीं रद्दी गाणीं कधीं च म्हणणार नाहीं.

आत्माराम:– मधु, गाणें आणि त्याचा अर्थ इतका गोड आहे तर खरोखर तो माणूस किती गोड असेल बरें ? असा देव माणूस आज दुनियेवर असेल कां रे ?

मधू:– मला तर वाटतें नसेल. पूर्वीं असे साधुसंत होऊन गेले. आतां कोठले साधु आणि कोठले संत !

बुद्धि:– पण का रे मधू ! आज साधुसंत कां नसतील रे ? पूर्वीं दुनियेंत देव होता आणि आतां देव मेला का रे ? मला वाटतें आज हि असें साधुसंत असतील.

आत्माराम:– अरे, आपण आपापसांतच कां वादत बसतों ? चला, भाऊला विचारूं कीं हें गाणें कोणाचें आहे म्हणजे आपल्याला कळेल कीं असा देव माणूस आज आहे कीं नाहीं.

सर्व:– हो ! हो ! चला. (सर्वजण भाऊपाशीं येतात)

मधू:– भाऊ ! हें गोड गाणें संपलें का ? गाण्यांतला देवमाणूस आज दुनियेवर आहे का ? असेल तर त्याचें नांव गांव सांग ना.

भाऊ:– हें गाणें पुष्कळ मोठें आहे. आणि तो देवमाणूस आज दुनियेवर आहे. अगदीं आपल्या जवळ आहे.

मोरू:– तो आपल्या गांवाजवळ असेल तर आम्ही त्याच्या दर्शनाला जाऊं. सांग ना त्याचें नांव, गांव.

भाऊ:– पुढचें गाणें सांगतों तें ऐकलें म्हणजे तुम्हाला तो देवमाणूस ओळखू येईल. म्हणा बरें:– (एकेक ओळ म्हणवतो)

न्यायी मन प्रभुचें तळमळलें
गांधीरुपानें प्रगट जाहलें
परवशता पाहुनि हळहळलें
सत्याग्रह हें शस्त्र अर्पिलें

निजलेले जन उठूं लागले, मुके लोक ते बोलुं लागले
पंगु लोक ते चालूं लागले, नव्हे मृतांना अमृत लाभलें
अरि ना जगीं तुला रे, तूं शत्रु ना कुणाचा ।
असती अजातशत्रु, तूं मित्र या जगाचा ॥

सर्व मुलें ओरडतात:–ओ हो ! महात्माजी, महात्माजी, सेवाग्रामला राहतात. सेवाग्रामला राहतात. आम्हीं त्यांचें दर्शन घेतलें. दर्शन घेतलें.

कांहीं मुलें:—आम्हीं दर्शन नाहीं घेतलें. आज घेणार.

सिंधु:— मग चला तर. (थोडेंसें जातात. तेवढ्यांत-न्यायी मन प्रभुचें तळमळलें-हें कडवें म्हणत म्हणत कांहीं मंडळी येतात.)

मधु:— भाऊ, हे कोण लोक ? आपलें गाणें यांना हि ठाऊक आहे. कोठें चालले असतील ?

भाऊ:– विचार त्यांना.

मधु :– नमस्कार हो, नमस्कार, तुम्हीं कोठें रहातां ? कोठें चाललां ?

मंडळी:– आम्ही केळझरला रहातों. मागें तेथें जंगल-सत्याग्रह झाला तेव्हां पासून आम्ही महात्माजींचें नांव ऐकलें. आज त्यांचा वाढदिवस आहे. म्हणून त्यांचें दर्शन घ्यायला सेवाग्रामला जातों. त्यांनीं आम्हां गरीब लोकांना माणुसकी शिकविली. नाहींतर कोण सरकारचा त्रास ! आम्हाला ढोरासारखें वागवीत होते. आणि आम्ही हि त्यांना अगदीं भीत होतों.

मधु:– जरा थांबा ना ? बरोबरच जाऊं. आतांच सत्याग्रहाचें नांव निघालें होतें. एखादें सत्याग्रहाचें गाणें म्हणा ना !

मंडळी गातात-
जगावें हिंदभूसाठीं, मरावें हिंदभूसाठीं
राज्य जेथें असत्याचें, सुजन-छलका मान जेथें
गृह कशाचें? सुख कशाचें? हाल तेथें नरक तेथें
स्वर्ग कारागृहीं तेथें, घरीं बसणें नरक तेथें
एकटा मी, धाकटा मी, साह्य नाहीं कुणीं मजला
झुगारुनी द्या अबलता ही साक्ष ठेवा स्वहृदयाला
लोकभय वा राज्यभय वा नका त्याची करूं परवा
एक देवा जगीं भ्यावें वरकडांचा कोण केवा ?
शस्त्रधारा विफल होती अग्नि होई थंडगार
त्रिभुवना सत्यबल नमवी सत्य हें तत्त्वचि थोर
छंद नारायणाचा घे बाळ प्रल्हाद नच सोडी
मारिलें जाळिलें किती हि अधिक तों लागली गोडी
जन्म घेणें मजा करणें मरुनि जाणें एक दिवशीं
जीविताचें हें चि फल का, विचारावें निज मनाशीं
देह जावो तसा राहो शपथ घ्या मायभूसाठीं ॥

www.vinoba.in



( गाणें संपतें तेवढ्यांत हातांत चरखे, पिंजणी वगैरे घेऊन ' पूर्ण दयेनें प्रभु मन भरलें ' म्हणत म्हणत कांहीं लोक येतात. )

**सिंधूः–** आज तर मोठी मौज दिसते. सगळींकडे माणसें च माणसें ! कांहो तुम्ही कोण, कोठें चाललां ? जरा तुमचें गाणें तर ऐकवा ना ?

**मंडळीः–** आम्ही या **पवनारला** राहतों, **सेगांवला** जातों. **महात्माजींच्या** दर्शनाला. आमच्या गांवीं चरखे, पिंजण, खांडण-विंचरण, तेलघाणा सुरू झाला आहे. गरिबांना काम मिळतें. पोटाला भाकर मिळतें. देव महात्माजींचें भलें करो. ऐका आमचें गाणें—

पूर्ण दयेनें प्रभुमन भरलें, गांधीरुपानें प्रगट जाहलें
दैन्य पाहुनी जीव तळमळला, चक्की-चरखा जनां अर्पिला
खऱ्या सुखाचा मार्ग दाविला, दरिद्र-नारायण तोषविला
अरि ना जगीं तुलारे, तूं शत्रु ना कुणाचा ।
अससी अजातशत्रु, तूं मित्र या जगाचा ।।

**पद्माकरः–** का रे वसंता ! अजून ती **सुरगांवची** मंडळी नाहीं आली ? तीं म्हणत होतीं ना आपण **पवनारला** भेटूं, मग बरोबर जाऊं.

**वसंताः–** येतील. जरा वाट पाहूं. तों पर्यंत कांहीं पदें वगैरे म्हणं.

( सर्वजण म्हणतात )

जे कां रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुले
तो चि साधु ओळखावा, देव तेथें चि जाणावा
मृदु सबाह्य नवनीत, तैसें सज्जनांचें चित्त
ज्यासि आपंगिता नाहीं, त्यासि धरी जो हृदयीं
दया करणें जे पुत्रांसि, ते चि दासा आणि दासी
तुका म्हणे सांगूं किती, तो चि भगवंताची मूर्ति ।।

( अभंग म्हणून होतो तेवढ्यांत दिंडी--पताका घेऊन "पवित्र तें कुळ पावन तो देश" म्हणत म्हणत **सुरगांवची** मंडळी येतात. )

**मंडळीः–**
पवित्र तें कुळ पावन तो देश, जेथें हरिचे दास जन्म घेती
वर्ण अभिमानें कोण जालें पावन, ऐसें द्या सांगून मजपाशीं
वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार, धागा हा चांभार रोहिदास
कबीर मोमिन लतिफ मुसलमान, सेना न्हावी आणि विष्णुदास
कान्होपात्र खोदु पिंजारी तो दादू, भजनीं अभेदु हरिचे पायीं
चोखामेळा बंका जातीचा महार, त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी

यातायाती धर्म नाहीं विष्णुदासा, निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं
तुका म्हणे तुम्हीं विचारावे ग्रंथ, तारिले पतित नेणों किती ॥

पद्माकरः— कां बरें तुम्हांला उशीर झाला ? आणि ह्या दिंड्या नि पताका कशाला ? जणूं यात्रेला चालला.

एकनाथः— आम्ही निघत होतों. तों जो तो म्हणूं लागला मी येतों, मी येतों. त्या सर्वांना घेऊन यायला उशीर झाला. आम्ही तर खरोखरीच यात्रेला चाललों.

किसनः— तीर्थीं धोंडापाणी, देव रोकडा सज्जनीं । महात्माजींत तर रोकडा देव आहे त्यांनीं उपवास केले तेव्हांपासून आमचें सुरगांवचें देऊळ आम्हां हरिजनांना खुलें झालें आहे. आतां रोज गोपाल-कृष्णाचें दर्शन घेतां येतें.

चिंधूः— अशा त्या महात्माजींचा आज वाढदिवस आहे, म्हणून त्यांच्या दर्शनाला आम्ही जातों. ज्यांनीं आम्हाला गोपाल-कृष्णाचें दर्शन घडविलें त्यांच्या दर्शनाला जाणें ही च आमची खरी यात्रा.

म्हणारेः—

कोमल मन प्रभूचें त्या द्रवलें
गांधी रुपानें प्रगट जाहलें
अस्पृश्यतेनें चित्त व्याकुळलें
प्राण आपुले पणा लाविले
दलित बंधूंना मंदिर खुललें
नव्हे बंदिचे देव चि सुटले
अरि ना जगीं तुला रे, तूं शत्रु ना कुणाचा ।
अससी अजातशत्रु, तूं मित्र या जगाचा ॥

भाऊः— चला आता, केळझरची, पवनारची व सुरगांवची मंडळी हि आली. आराम हि मिळाला.

(चालूं लागतात. थोडें गेल्यानंतर)

मोरूः— भाऊ, भाऊ, नालवाडीचीं मुलें आलीं रे आलीं ।
( नालवाडीच्या मुलांच्या हातांत तकली, लपेटे, सुताचे हार, चित्रें, वह्या वगैरे आहेत. दोन्हीकडचीं मुलें एकमेकांना नमस्कार करतात.)

विनायकः— कां रे माणिक ! हीं चित्रें नि वह्या घेऊन कोठें शाळेंत चाललां ?

**माणिक:–** आम्ही शाळेंत नाहीं जात. आम्ही सेगांवला महात्माजींच्या दर्शनाला जातों. त्यांनीं आमच्यासाठीं नवीन शाळा काढल्या. अगोदर मास्तर किती मारे ! कान धरे !

**उस्मान:–** आणि पुस्तकाच्या बाहेर पाहूं च देत ना ! मला तेव्हां शाळेचा मोठा त्रास वाटे. मी शाळेचें नांव घेऊन पळून जात असें.

**मधुकर:–** आतां ते मारणें नाहीं. कान धरणें नाहीं. घोकणें नाहीं. आनंदाचें शिकणें आहे. खेळणें, सूत कांतणें, चित्रें काढणें, लिहिणें-वाचणें, झाडांना पाणी घालणें, किती मजा !

**दुर्गा:–** ज्या महात्माजींनीं अशा शाळा काढल्या त्यांच्या दर्शनाला आम्ही जातों. त्यांना हा सुताचा हार घालूं. आमचें सूत दाखवूं. चित्रें दाखवूं.

**विश्वास:–** आणि हें गाणें हि म्हणूं––

प्रेमें मन प्रभुचें ओथंवलें, गांधी रुपानें प्रगट जाहलें
बाल-बालिकां पाहुनि रमलें, ज्ञान-कर्म-मय शिक्षण दिधलें
बाल-मनाला अति मानवलें, हृदय कमल तें उमलुं लागलें
पिंजर-बंदी शुक-मैना सुटल्या, मंजुळ गाणीं गाऊं लागल्या ॥
अरि ना जगीं तुला रे, तूं शत्रु ना कुणाचा।
अससी अजातशत्रु, तूं मित्र या जगाचा ॥

( चालत चालत मंडळी सेवाग्रामला येऊन पोंचतात.)

**आत्माराम:–** भाऊ, मला वाटलें होतें आपण च सेवाग्रामला चाललों. परंतु येथें तर सगळीकडचीं मंडळी आलीं आहेत.

**मधु:–** आणि मी तर महात्माजींचें नुसतें नांवच ऐकलें होतें. पण त्यांनीं काय काय कामें केलीं तें आजच कळलें.

**सिंधु:–** महात्माजींनीं सत्याग्रह शिकविला, चरखा-संघ काढला. हरिजनांसाठीं मंदिरें उघडविलीं. आपल्यासाठीं शाळा काढल्या. कितीतरी कामें केलीं.

**भाऊ:–** बापुजींनीं आणखीहि पुष्कळ कामें केलीं आहेत. तुम्ही मोठे झालां म्हणजे कळेल. आतां आज त्यांच्या वाढदिवसासाठीं येथें आलों आहों तर आपण त्यांना नमस्कार करूं व देवाची प्रार्थना करूं या. म्हणा:––(एकेक ओळ म्हणवून घेतो)

बापूजींचे किति गुण गावे, नम्र होउनी पद वंदावे,
आज प्रभूला हें मागावें,बापूजींना उदंड जगवावें,
मार्ग तयांचा अनुसरण्याला, बुद्धि आणि बळ आम्हां द्यावें.

www.vinoba.in



( पान १२८ वरून चालू —)

भाऊः— माझ्या बाळमित्रांनों ! आज आपण येथें जमलों. बापूजींचें दर्शन घेतलें. गाणीं गायलीं. पण बापूजी म्हणतात त्याप्रमाणें आपण वागलें पाहिजे. हरिजनांना जवळ केलें पाहिजे. सूत कांतलें पाहिजे. खादी वापरली पाहिजे. हें करूं तर आपण बापूजींचा वाढदिवस खरा साजरा केला असें होईल.

सर्वजणः— आम्ही तसें करूं. सूत कांतूं. खादी वापरूं. मुसलमान हरिजन वगैरेंना जवळ करूं.

भाऊः— ठीक आहे. तुमच्या लक्षांत रहाण्यासाठीं बापूजींचा संदेश मी तुम्हाला एका पदांत सांगतों. तें ऐका. म्हणा, लक्षांत ठेवा व वागा !

तुम्हां संदेश गांधीचा । असावा वेष खादीचा ।। धृ ।।  
सूत कांता विणा खादी । करा देशांत आबादी ।  
स्वावलंबी बना सारे । बंधुनों चैन, सोडा रे ।।१।।  
जातिभेदां न द्या थारा । दुष्ट ही विषमता मारा ।  
शांति राखा ऐक्य जोडा । सोडवा जन्म-भू-खोडा ।।२।।  
तुम्हा संदेश— ।।धृ० ।।

---

( आश्रम-समाचार–मल पृष्ठ २ वरून चालू )

नव्या इमारतींत मुरड्याच्या विकारानें दोघे आजारी होते आतां त्यांची प्रकृति सुधरत आहे.

सेवाग्राम आश्रमचा ट्रस्ट. ग्रामसेवा मंडळाच्या नांवानें झाला आहे. तेथील व्यवस्थेसाठीं तिघांची एक स्वतंत्र समिति नेमण्यांत आली आहे.

चर्मालयाची व्यवस्था ता० ११-९-४१ पासून गांधी सेवा-संघानें ग्रामसेवा मंडळाकडे सोंपविली आहे.

( मल पृष्ठ ४ पहा )

www.vinoba.in
र. नं. ना.–८१०



**सरंजाम-कार्यालय** — महागाईमुळें पेटी-चरख्याची किंमत चार रुपये व तकलीची दोन आणे करण्यांत आली असून यापुढें तेलडबी किसान-चरख्यावरोबर दिली जाणार नाहीं. साबरमतीचें मारुतिदास येथें आले असून मगन-चरख्याचे प्रयोग करीत आहेत. सरंजामाची मागणी बरीच आहे परंतु ती पुरविणें कठिण झालें आहे.

**खादी-समिति**— कताईचें काम तालुक्याच्या कांहीं भागांत वाढत आहे. पवनार केंद्राखालीं जवळच्या दोन गांवीं काम वाढलें आहे. सिंदीला विणाईचें केंद्र नवीन सुरू केलें तें वाढीस लागलें आहे. सध्यां ३५ विणकर कामावर आहेत. कताईचें काम सिंदी केंद्रांत १ आगष्टपासून सुरू केलें आहे. आतांपर्यंत २२ चरखे सुरू झाले आहेत. आणखी वरी च मागणी आहे. त्या भागांत दोन कार्यकर्ते स्थायी ठेवले आहेत. वस्त्रस्वावलम्बी लोकांची संख्या हि वाढत आहे. आतांपर्यंत नवीन वस्त्रस्वावलम्बी १२५ च्या आसपास झाले आहेत. नालवाडी परिश्रमालयांत ७-८ मगन चरखे चालू ठेवले आहेत. यांत प्रयोगाची हि दृष्टि आहे.

---

**चुकीची दुरुस्ती**:— "वृत्ता"च्या गेल्या अंकांत पान ९७ ओळ २३ मध्यें "मदत घेणें" याच्याऐवजीं "मदत घेत असतांना गांवच्या कार्यासाठीं सरकारची मदत घेणें" असें वाचावें.

---

प्रकाशक:—गोपाळ नरहर काळे, ग्राम-सेवा-मंडल, नालवाडी, वर्धा
मुद्रक:—वल्लभदास जाजू, श्रीकृष्ण प्रिंटिंग वर्क्स लिमिटेड, वर्धा